नि.फौ.ख.क्र.४९३/२०१९
सरकार –वि– प्रसाद
नि.क्र. २३

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०३ यांची जबानी–</u>**

मी या द्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

नाव :– भारत रानबा पाटील,
वय :– ५६ वर्ष, व्यवसाय – व्यवसाय
राहणार :– ऐश्वर्या सोसायटी, चिखली, पुणे

**<u>सरतपासणी सहा.सरकारी अभियोक्ता श्री. जी. एम. बारगजे यांचे तर्फे</u>**–

०१. कोमल ही माझी पुतणी आहे. तिचे लग्न दि.०४.०२.२०१४ रोजी बेळगांव येथे प्रसाद चंद्रकांत कंग्राळकर सोबत झाले. माझे पुतणीला लग्नात रूपये दहा हजार रोख व साडे पाच तोळे सोने देण्यात आले होते. लग्नाचा एकुण खर्च पाच लाख झाला होता.

०२. कोमल ही लग्नानंतर आरोपी प्रसाद सोबत चिंचवड येथे राहावयास आली. सहा महिने सुरळीत संसार चालला त्यानंतर लहान मोठे तक्रारी झाल्यात व भांडणे झालीत. आरोपी हा कोमल हिला म्हणायचा की, तु तुझे पगारातुन तुझे आईवडीलांना देते. यावरून तो तिच्या सोबत भांडणे करायचा व मारहान करायचा. त्यामुळे ती आमचे घरी फोन करून सांगायची. त्यावर मी तिला सांगायचो की, संसारात लहानमोठे भांडण होत असतात व तु व्यवस्थित राहा.

०३. त्यानंतर डोहाळे जेवनाचे कार्यक्रमला मान पान केला नाही म्हणून आरोपी प्रसादने माझ्या भावासोबत भांडण केले व माझा भाऊ व वहिणी यांना धक्काबुक्की केली. सदर घटना ही महेश नगर, नेहरू नगर जवळील पिंपरी येथे घडली. आरोपी कोमलवर संशय घ्यायचा की, तीचे त्याच्या मित्रासोबत अनैतिक संबंध आहेत. त्यामुळे प्रसाद हा कोमलला मारहान करायचा.

०४. कोमल मला मारहानीबाबत फोन करून सांगत असे. त्यानंतर प्रसादने घटस्फोटाची मागणी केली व खुप मारहान सुध्दा केली होती. तेव्हा रात्रीचे १२.३० ते १.०० वा. होते. कोमलने आई वडीलांना फोन केल्यामुळे ते तिला त्याच रात्री माहेरी घेवून आले. आरोपी हा कोमल ही पैसे देते, चारित्र्यांवर संशय व अशा कारणावरून तिला मारहान करत असे. आरोपी हा न्यायालयात हजर आहे व मी त्यास ओळखतो.

**<u>उलटतपास आरोपी प्रसाद कडून व्यक्तीशः</u>** –

०५. कोमल ही तिचे आईवडिलांना पैसे नसत. आरोपी हा कोमलवर संशय पैसे देते म्हणून मारहान करत असत. कोमल हीने मारहानीबाबत दवाखान्यात उपचार घेतलेले नाहीत अथवा तिला उपचाराकरीता दवाखान्यात दाखल करून घेतले नाही. कोमल ही घटना तिचे आईवडीलांना सांगायची व तिचे आईवडील मला सांगायचे.

०६. डोहाळे जेवनाच्या वेळेस मारहान ही माझ्या भाऊ व वहिणीसोबत झाली. दवाखान्यात दाखल करून घेण्याजोगी धक्काबुक्की नव्हती त्यामुळे दवाखान्यात दाखल केले

नव्हते. मी कोमलचे सासरकडचे फक्त तिच्या पतीला ओळखतो इतरांना ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की, फोटो काढण्याचा संशय बाबत माझ्या भावाने मला सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हा कोमलला मारहान करतो हे कोमलने तिचे आईवडिलांनाच सांगितले होते. मी आरोपीने कोमलला मारताना पाहिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, कोमलने रात्री १२.३० वा. तिचे आईवडीलांना फोनवरून फोन केला होता.

**०७**. त्या रात्री माझा भाऊ दुचाकीवर कोमलचे घरी गेला होता परंतु मला सदर वाहनाचा नोंदणी क्रमांक माहित नाही. भावाने मला रात्री १२.३० वा. चे घटनेचे फोन करून सांगितल्यामुळे मला समजले. साक्षीदार पुढे स्वतःहून सांगतो की, त्यानंतर तो त्याच्या भावाच्या घरी गेला होता. मला निश्चित वेळ, दिवस सांगता येणार नाही की, आरोपीने कोमलचे मित्रासोबत अनैतिक संबंध बाबत केव्हा संशय घेतला व फोटो काढले. हे म्हणणे खरे आहे की, सदर पुर्ण घटना मला भावाने सांगितल्या आहेत.

**०८**. आरोपीने कोमलला परत नांदायला बोलविलेच नाही. मला माहित नाही की, सन २०१७ मध्ये कोमल ही तिचे सासरी दिवाळी साजरी करण्याकरीता गेली होती. मला कोमलने सांगितले नाही की, तिला मुलामुळे जॉब सोडायचा आहे. मला माहित नाही की, कोमलने कौटुंबिक हिंसाचार या प्रकरणात तिला माहेरून चार तोळे सोने दिले असे कथन केले आहे. लग्नात पाच लाख खर्च झाल्याबाबतचे बिल हे सादर करण्यात आले नाही कारण की फक्त खर्चाची नोंद ठेवल्या जाते. माझा भाऊ सांगु शकेल की, त्याने सदर खर्चाच्या नोंदी ठेवल्या किंवा नाही. साडे पाच तोळे याचे विवरण दिले नाही.

**०९**. **फेरतपास** – नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

sd/–

(मा.गो.मोरे)

दिनांक :–०५/०८/२०२४

**सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**

**पिंपरी, पुणे.**